महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ८४ वा | दिनांक : २५/१२/२०२४ | वार : बुधवार

## बीडमध्ये कुणाचीही दादागिरी खपवून घेतली जाणार नाही : देवेंद्र फडणवीस



**नागपूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून मोठा इशारा दिला आहे. बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील कोणत्याही आरोपीला सोडणार नाही. बीडमध्ये कुणाचीही दादागिरी खपवून घेतली जाणार नाही. पालकमंत्री पदाबाबत आम्ही मिळून ठरवू, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. देवेंद्र फडणवीस किंवा अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्री स्वीकारायला हवे, अशी मागाणी भाजप आमदार सुरेश धस यांनी केली होती.

त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली.

बीड जिल्ह्यात कायदा नावाची काही गोष्ट राहिली नाही. जी लोकं स्वत:ला बीड जिल्ह्याचे पालक म्हणून घेत होती ते गँग ऑफ सफेपूर का वासेपूर झाल्याचे सुरेध म्हणाले होते. असे म्हणत आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड हाच प्रमुख सूत्रधार असल्याचे म्हणत देवेंद्र फडणवीसांनी बीडचे पालकमंत्रिपद घ्यावे, अशी मागणी सुरेश धस यांनी केली होती. त्यांच्या या मागणीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपरोक्त इशारा दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी महाराष्ट्रातील वाढत्या गुन्हेगारीवर भाष्य करत चिंता व्यक्त केली आहे. फक्त पोलिसांची बदली करून चालणार नाही. त्यापेक्षा कोण आरोपी आहे हे शोधले पाहिजे. बीड आणि परभणीमध्ये ज्या घटना झाल्या त्यावर विश्वास बसत नाही. जे सिनेमात पाहिले ते वास्तव महाराष्ट्रामध्ये पाहायला मिळत आहे. पुढचा महाराष्ट्र कसा असेल अशी भीती वाटत आहे, मला कधीही भीती वाटली नाही, पण आता वाटत आहे, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात राज्य सरकारतर्फे विशेष सरकारी वकील म्हणून बाळासाहेब कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शनिवारी बीडच्या पोलीस अधीक्षकपदी नवनीत कांवत यांची नियुक्ती करण्यात आली होती. हे हत्या प्रकरण योग्य प्रकारे हाताळण्यासाठी राज्य सरकारतर्फे विशेष सरकारी वकिलांची नेमणूक करण्यात आली आहे. विशेष सरकारी वकील म्हणून सरकारने बाळासाहेब कोल्हे यांची नियुक्ती केली आहे.

## माजी मंत्री तानाजी सावंत यांच्या पुतण्यांना जीवे मारण्याची धमकी

**धाराशिव :** शिवसेना शिंदे गटाचे आमदार तथा माजी मंत्री तानाजी सावंत यांच्या दोन पुतण्यांना जीवे मारण्याची धमकी आली असल्याचे समोर आले आहे. तुमचा देखील संतोष देशमुख करू, अशी धमकी हल्लेखोरांनी एका पत्रातून दिली आहे. धनंजय सावंत आणि केशव सावंत असे या पुतण्यांची नावे आहेत. विशेष म्हणजे धनंजय सावंत यांच्या घरासमोर या पूर्वी देखील गोळीबाराची घटना घडली होती.

धनंजय सावंत आणि केशव सावंत यांना धमकी देण्यात आलेल्या पत्रात म्हंटले आहे की तुमचा देखील संतोष देशमुख मस्साजोग करू, असे म्हणत शंभर रुपयांच्या नोटेसोबत हे पत्र पाठवण्यात आले आहे. या प्रकारची धमकी मिळताच धनंजय सावंत आणि केशव सावंत यांनी ढोकी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

धनंजय सावंतांचा सोनारी येथे भैरवनाथ साखर कारखाना आहे. केशव सावंत हे तेरणा कारखान्याचे कार्यकारी संचालक आहेत. कारखान्याकडे जाणारा ट्रॅक्टर अडवत अज्ञात दोघांनी चालककाला बंद पाकिट दिलं. त्या बंद पाकिटात जीवे मारण्याचे धमकीचे पत्र होते. विधानसभा निवडणुकीपूर्वी धनंजय सावंत यांच्या घरावर गोळीबार झाला होता. धनंजय सावंत हे धाराशिव जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आहेत.

या घटनेनंतर धनंजय सावंत यांनी पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत. आमच्या जीवाला धोका निर्माण झाल्यावरच पोलिस डिपार्टमेंट याचा शोध घेणार का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. तसेच धनंजय सावंत थेट राज्य गृहमंत्र्यांकडे या प्रकरणी तक्रार करणार असल्याचे समजते. दरम्यान, या घटनेने धाराशिव जिल्ह्यात चांगलीच खळबळ उडाली आहे. या घटनेच्या निषेधार्थ उद्या तानाजी सावंत यांच्या मतदारसंघातील भूम शहर बंद ठेवण्याचा इशारा सावंत समर्थकांनी दिला आहे. या घटनेचा तपास लवकर व्हावा यासाठी धाराशिवमध्ये शिवसेनेकांकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देखील देण्यात आले आहे.

## गृहमंत्री अमित शहा यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी काँग्रेसचा "डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन्मान मोर्चा"



**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय राज्यघटनेच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त लोकसभेतील विरोधी पक्षनेते श्री राहुल गांधी आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते श्री मल्लिकार्जुन खरगे यांनी लोकसभा सभापतींना संविधानावर चर्चेची विनंती करणारी पत्र लिहिले होते. हा प्रस्ताव मान्य झाला आणि संसदेत विचारविनिमयाची प्रक्रिया सुरु झाली.

तथापि, संविधानावरील गंभीर आणि महत्त्वपूर्ण चर्चा म्हणून जी सुरुवात झाली ती भाजपच्या राजकीय संधिसाधूपणाच्या लज्जास्पद प्रदर्शनात बदलली. प्रसंगी प्रतिष्ठा जपण्याऐवजी भाजपने विरोधी पक्षनेत्यांची बदनामी आणि अपमान करण्यासाठी व्यासपीठाचा गैरवापर केला. त्याहूनही वाईट म्हणजे केंद्रीय गृहमंत्र्यांनी राज्यघटनेचे मूलतत्त्व आणि त्याचे प्रमुख शिल्पकार बाबा साहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांची अवहेलना केली. गृहमंत्र्यांचे धक्कादायक वक्तव्य-"आता ही एक फॅशन बनली आहे आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर. 'इतक्या वेळी तुम्ही जर देवाचे नाव घेतले असते तर तुम्हाला पुढचे सात जन्म स्वर्गाची प्राप्ती झाली असती." (आंबेडकर वारंवार म्हणणे ही एक फॅशन बनली आहे. त्यांनी देवाचे नाव इतक्या वेळा घेतले असते, तर त्यांना सात जन्मासाठी स्वर्ग मिळू शकला असता) - हा केवळ डॉ. आंबेडकरांचा अपमान नव्हता तर थेट भारताच्या आत्म्याचा अपमान होता.हे भयंकर वर्तन असूनही भाजप आणि त्यांच्या नेतृत्वाने कोणताही पश्चाताप दाखवला नाही. त्याऐवजी, ते अशा विधानांचा बचाव करून कोट्यवधी भारतीयांना होणाऱ्या दुखापतींना आणखी वाढवत आहेत, त्यांच्या गंभीर घटनाविरोधी आणि दलितविरोधी मानसिकतेचा पर्दाफाश करत आहेत.या घटनेच्या विरोधात गृहमंत्री अमित शहा यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी च्या आदेशानुसार छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहर व जिल्हा काँग्रेस कमिटी तर्फे "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन्मान मोर्चा" ला सुरुवात सकाळी ठीक ११.०० वा. महात्मा ज्योतिबा फुले स्मारक येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याला अभिवादन करून करण्यात आली व शहागंज येथील महात्मा गांधी पुतळा मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा नेण्यात आला व जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्हा काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष खा.डॉ. कल्याण काळे व शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष मा. शेख युसुफ यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. खा.डॉ. कल्याण काळे, माजी मंत्री अनिल पटेल, शहरजिल्हा अध्यक्ष शेख युसुफ यांनी मोर्चाला संबोधित केले. यावेळी एम.के. देशमुख, डॉ.जफर खान, रविंद्र काळे, जगन्नाथ काळे, विश्वास औताडे, मोहन देशमुख, उमाकांत खोतकर, ॲड.सय्यद अक्रम, दिपाली मिसाळ, इंजि. विशाल बन्सवाल, डॉ. पवन डोंगरे, राहुल सावंत, कैसर बाबा, अशोक डोळस, संदीपराव बोरसे, संतोष शेजूळ, सचिन पवार, इक्बालसिंग गिल, गजानन मते, प्रकाश सानप, विठ्ठल कोरडे, संदीपराव पवार, शेख फय्याजोद्दीन, मनोज शेजवळ, निमेश पटेल, आतिश पितळे, गौरव जैस्वाल, भगवान मते, अनिता भंडारी, शिला मगरे, अमजद पटेल, पुंडलिक जंगले, अभिषेक शिंदे, बाबासाहेब मोकळे, श्रीकृष्ण काकडे, भास्कर घायवट, युनूस लिडर, लहू शेवाळे, संतोष भिंगारे, बाबुराव कवसकर, हकीम पटेल, सुरेंद्र साळुंखे, सलीम इनामदार, अमजद खान, कृष्णा भंडारे, अस्मत खान, शेख इफ्तेकार, रमाकांत गायकवाड, प्रमोद सदाशिवे, प्रशांत शिंदे, शेख रफीक, शफीक शहा, अलंकृत येवतेकर, मंजू लोखंडे, रुबिना सय्यद, चंद्रप्रभा खंदारे, योगेश थोरात, संतोषकुमार दिडवाले, विद्याताई घोरपडे, शुभम साळवे, आमेर खान, निलेश भाग्यवंत, शकुंतला साबळे, रवि लोखंडे, जयपाल दवणे, साहेबराव बनकर अदी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. शहर जिल्हाध्यक्ष शेख युसुफ यांनी आभार मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ डिसेंबर २०२४

# फुलंब्री तालुका ग्राम महसूल संघटना अध्यक्षपदी मधूकर थोरात



**कन्नड (अरुण थोरात) :** फुलंब्री तालुका ग्राम महसूल(तलाठी) संघटनेची कार्यकारिणी निवडी साठी दि. २३ डिसेंबर रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात संघटनेच्या फुलंब्री तालुकाध्यक्ष पदी कळंकी ता.कन्नड येथील भूमीपुत्र मधूकर आसाराम थोरात यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

सोमवारी संघटनेचे मा. राज्याध्यक्ष अनिल सूर्यवंशी यांच्या अध्यक्षते खाली व जिल्हाध्यक्ष भदाणे, मराठवाड्याचे विभागीय सरचिटणीस आप्पासाहेब गोराडे, जिल्हा सरचिटणीस धनंजय साळवे, जिल्हा कार्याध्यक्ष डी.जी. जरारे तसेच जिल्हा प्रतिनिधी पी.एन. बिरारे यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. यावेळी मा.राज्याध्यक्ष सूर्यवंशी यांनी उपस्थित सभासदांना अत्यंत अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

संघटनेची फुलंब्री तालुका कार्यकारणी पुढील प्रमाणे अध्यक्ष- मधुकर थोरात, सचिव- पंडित काकडे, कार्याध्यक्ष- शुभांगी जाधव- बोडखे, उपाध्यक्ष-अरुण दाढे, सहसचिव- संतोष गायकवाड, सल्लागार- लक्ष्मण हरणे, संघटक- महेंद्र मुनवर, संघटक- गणेश गोरे, संघटक- अजित गावंडे, महिला प्रतिनिधी- स्नेहा जोनवाल- जारवाल, सल्लागार- मनीष खरे, नवनियुक्त तालुकाध्यक्ष मधुकर थोरात हे कळंकी येथील भूमीपुत्र असून त्यांना नुकतेच आदर्श तलाठी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

महसूली सेवे आगोदर त्यांनी ग्रामपातळीवरील सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक क्षेत्रात मोठे योगदान दिले होते. सहकार विभागातील गटसचिव पदा पासून त्यांनी आपल्या प्रशासनिक कार्यास सुरुवात केली होती. त्यांच्या या निवडी बद्दल कळंकी ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करत अभिनंदन केले.

# संपादक, पत्रकार, सत्यशोधक डॉ. संभाजी खराट आदरांजली सभा



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्रातील सत्यशोधक विचारवंत व साहित्यिक, सत्यशोधकी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, पत्रकार, सत्यशोधक डॉ. संभाजी खराट आदरांजली सभा दि २५/१२/२०२४, बुधवार रोजी सकाळी १०.३० वाजता महात्मा गांधी भवन विभागीय शासकीय ग्रंथालयाच्या बाजुस,समर्थ नगर सावरकर चौक, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आली आहे.

डॉ. संभाजी खराट यांचे दि. ११ डिसेंबर २०२४ रोजी दु:खद निधन झाले. भारतात समतावादी सामाजिक क्रांती घडवून आणणाऱ्या फुले,शाहू, आंबेडकरी प्रबोधन चळवळीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या निधनाने सत्यशोधक चळवळीचे फार मोठे नुकसान झाले आहे.

त्यांच्या विचार व कार्याला अभिवादन करण्यासाठी भारतीय पिछडा शोषित संघठन, सत्यशोधक शिक्षक सभा, सत्यशोधक विद्यार्थी संघटना तसेच इतर सर्व पुरोगामी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आदरांजली सभेचे आयोजन केले आहे.

तरी आपण या अभिवादन सभेस आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. उमेश बगाडे, डॉ. प्रल्हाद लुलेकर, प्रा. सुदाम चिंचाणे, प्रभाकर गायकवाड, प्रा. प्रकाश सिरसाट, डॉ. कालिदास भांगे, सरस्वतीताई हारकळ, आदींनी केले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
■ प्रोजेक्ट रिपोर्ट ■ डेझर्टेशन
■ पीएच.डी./एम.फिल.थेसिस ■ कलर प्रिंट
■ डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट ■ स्कॅनिंग
■ स्पायरल व हार्ड बायडींग ■ लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# मृदा वाचवूया.. पर्यावरण जपुया.. महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन तर्फे आवाहन




**कन्नड (अरुण थोरात):** "मृदा वाचवूया, पर्यावरण जपूया" असे आवाहन महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अंतर्गत मिशन महाग्रामचे तालुका समन्वयक विनोद उमक पंचायत समिती कन्नड, यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लामनगाव येथे जागतिक मृदा दिन जनजागृती उपक्रम साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

मृदेची गुणवत्ता सुधारण्यासाठी जैविक खताचा वापर, पाण्याचे योग्य व्यवस्थापन व पीक पद्धतीतील बदल यावर भर दिला. जागतिक मृदा दिन साजरा करण्यामागील उदिष्ट म्हणजे मृदेचे महत्व आणि तिच्या संवर्धनाची गरज याबद्दल जनजागृती करण्यासाठी मिशन महाग्राम अंतर्गत कन्नड तालुक्यातील ग्रामपंचायत लामनगाव येथे जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेमध्ये जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या वेळी मुख्याध्यापक श्री.राठोड, शिक्षक श्री.भावळे, शिक्षिका श्रीमती साबळे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले कवी ज्ञानेश्वर गायके, तालुका समन्वयक विनोद उमक तसेच गावातील शेतकरी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कवी श्री.गायके यांनी कवितेतून मृदा प्रदूषण आणि वृक्ष लागवड बद्दल विचार मांडले. मृदा संवर्धन वर बोलताना मुख्याध्यापक श्री. राठोड यांनी मृदेचे महत्व आणि तिच्या संरक्षनासाठी आवश्यक उपाययोजनेवर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना मृदा संवर्धनासाठी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. मृदा प्रदूषणाचे दुष्परिणाम, खते आणि रसायनाच्या अतिरेकी वापर यामुळे होणारे नुकसान समजावून सांगितले. विद्यार्थ्यांना मृदा संवर्धनासाठी घोषवाक्य तयार केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ डिसेंबर २०२४


# २८ व २९ डिसेंबरला नागपुरात 'अक्षरक्रांती आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सव

**नागपूर :** अक्षरक्रांती फाऊंडेशन व कला गौरव संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले शिक्षण संस्था सभागृह, रेशिमबाग, नागपूर येथे दि. 28 व 29 डिसेंबरला 'पहिले अक्षरक्रांती आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सव' संपन्न होत आहे.

शनिवार, दि. 28 डिसेंबरला स. 9.30 वाजता उद्घाटनसत्रात, उद्घाटक मा. किशोर कन्हेरे (अध्यक्ष, कन्हेरे फाऊंडेशन, नागपर), संमेलनाध्यक्ष मा. सुरेश पाचकवडे (ज्येष्ठ साहित्यिक, अकोला), विशेष अतिथी डॉ. रवींद्र शोभणे (अध्यक्ष, 97 वे अ. भा. म. सा. सं. अमळनेर) व मा. उर्मिला देवेन (प्रसिद्ध कादंबरीकार, जपान), मुख्य अतिथी मा. डी. बी. जगत्पुरिया (कवी, लेखक, पत्रकार, छ. संभाजीनगर) आयोजक मा. शंकर घोरसे (अध्यक्ष, अक्षरक्रांती फाऊंडेशन) व डॉ. संगीता मानेकर-बानाईत (अध्यक्ष, कला गौरव संस्था) या मान्यवरांची उपस्थिती राहतील.

याच सत्रात 'अक्षरक्रांती महाकाव्य स्पर्धे'चे विजेते मा. माणीक सोनवणे (छ. संभाजीनगर), मा. विद्या निनावे (नागपूर), मा. भावना गंगमवार (यवतमाळ) यांना पाहुण्यांचे हस्ते पुरस्कार दिले जातील. तसेच 'आदर्श सरपंच' मा. मंगलाताई घोपे (जलम), 'वृद्धसेवा'चे मा. प्रदीप चंदनबटवे (श्री क्षेत्र आदासा), 'कौमार्य' मराठी चित्रपटाचे गीतकार मा. संजय बंसल (उमरेड), सामाजिक कार्यकर्ते मा. अनंत भारसाकळे (नागपूर) यांचा सत्कार केला जाईल. याचवेळी 'अक्षरठेव' स्मरणिका, देश-विदेशातील 11 कवी-लेखकांच्या साहित्यकृतींचे प्रकाशन तसेच ज्या सदस्यांचे 2023-24 या वर्षात पुस्तके प्रकाशित झालीत, त्यांचा 'साहित्य सन्मान सोहळा' घेण्यात येईल.

दुस-या सत्रात 'कथाकथन' होणार आहे. या कार्यक्रमाला अध्यक्ष मा. विजय इंगळे पाटील (प्रसिद्ध कथाकार, आकोट), प्रमुख अतिथी मा. संदीप निगळ्ये (राज फाऊंडेशन, गोवा) तसेच मा. अजय बुवा (लोकमत ब्यरो चिफ, गोवा), सहभागी कथाकार मा. अ. भा. ठाकुर (यवतमाळ), मा. संघमित्रा खंडारे (दर्यापूर), प्रा. लता थोरात (अकोला) यांची उपस्थिती राहील. सूत्रसंचालन मा. नरेंद्र माहूरकर करतील तर मा. कीर्ती लंगडे आभार मानतील.

तिस-या सत्रात शिक्षिका व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. संध्या पवार यांची मुलाखत मा. प्रकाश गायकी (पत्रकार, आकोट) हे घेतील. सूत्रसंचालन डॉ. लीना निकम करतील तर मा. निमा बोडखे आभार मानतील.

चौथ्या सत्रात गजलकार मा. बबन सराडकर,(अमरावती) यांच्या अध्यक्षतेत 'गजल संमेलन' होईल. मा. प्रवीण बोपुलकर (अध्यक्ष, शब्दवेल, पनवेल) यांची प्रमुख उपस्थिती राहील. अजिज खान पठाण हे प्रमुख अतिथी असतील. मा. अनंत नांदुरकर 'खलीश' (अमरावती) हे सूत्रसंचालन करतील तर आभार मा. प्रसेनजित गायकवाड करतील.

पाचव्या सत्रातील निमंत्रितांच्या कवीसंमेलनाला अध्यक्ष म्हणून मा. रवींद्र जवादे (सृजन साहित्य संघ, मूर्तिजापूर) असतील. मा. मधुकर वडोदे (खामगाव) हे अतिथी असून मा. प्रताप वाघमारे (नागपूर) यांची प्रमुख उपस्थिती राहील. मा. हितेश गोमासे हे सूत्रसंचालन करतील तर मा. ज्योती बन्सोड आभार मानतील.

रविवार, दि. 29 डिसेंबरला 9.30 वाजता सहावे सत्र सुरू होईल. यात 'संतांचा कर्मयोग आणि साहित्य' यावर परिसंवाद होणार आहे. डॉ. शुभदा फडणवीस (साहित्यिका, नागपूर) ह्या अध्यक्षस्थानी असून मा. ज्ञानेश्वर रक्षक (सुप्रसिद्ध साहित्यिक) हे प्रमुख अतिथी असतील तर मा. शफी पठाण (वरिष्ठ उपसंपादक, दै. लोकसत्ता, नागपूर) यांची प्रमुख उपस्थिती राहील. यात डॉ. राजेश मिरगे (अमरावती), डॉ. मंदा चांदूरकर (अमरावती), डॉ. स्मिता मेहेत्रे (नागपूर) हे वक्ते लाभणार आहेत. मा. विद्या सोनुले सूत्रसंचालन करणार असून मा. उज्ज्वला पाटील आभार मानतील.

सातव्या सत्रात डॉ. शोभा रोकडे (साहित्यिका, अमरावती) यांच्या अध्यक्षतेखाली 'कवयित्री संमेलन' होणार आहे. मा. अपूर्वा सोनार (अचलपूर) यांची प्रमुख उपस्थिती असेल तर मा. वैशाली ढाकुलकर (अमरावती) ह्या प्रमुख अतिथी असतील. सूत्रसंचालन मा. शीतल बोढे करणार असून मा. प्रा. अरुणा डांगोरे आभार मानतील.

आठव्या सत्रात 'वर्तमान शेतकरी दशा आणि दिशा' यावर चर्चासत्र होणार आहे. मा. गंगाधर मुटे (शेतकरी चळवळ, यवतमाळ) हे अध्यक्षस्थान भूषवणार असून डॉ. शरद निंबाळकर (माजी कुलगुरू, कृषी विद्यापीठ, अकोला) यांची उपस्थिती राहील. मा. गोपाल कडूकर (संपादक, दै. दिव्य वतन, नागपूर) हे प्रमुख अतिथी असतील. यात वक्ता म्हणून मा. अनंत भोयर (कचारीसावंगा), प्राची माहूरकर (नागपूर), सुनील चरपे (नागपूर) हे सहभागी होतील. सूत्रसंचालन मा. कोकीळा खोदनकर करणार असून डॉ. संगीता मानेकर-बानाईत हे आभार मानतील.

नवव्या सत्रात 'व-हाडी संमेलन' होत असून मा. ज्ञानेश वाकुडकर (लेखक व गीतकार) हे अध्यक्षस्थान भूषवतील तर प्रमुख उपस्थिती मा. श्याम ठक (अध्यक्ष, व-हाडी साहित्य संघ, अकोला) यांची असेल तर मा. किशोर मुगल (प्रसिद्ध व-हाडी कवी, चंद्रपूर) हे प्रमुख अतिथी राहतील. या संमेलनाचे सूत्रसंचालन मा. अनिकेत देशमुख (वाशिम) व मा. चंद्रशेखर महाजन (आकोट) हे करणार असून मा. दिवाकर देशमुख आभार मानतील.

दहावे सत्र हे समारोपीय कार्यक्रम असून याप्रसंगी संमेलनाध्यक्ष मा. सुरेश पाचकवडे (अकोला), विशेष अतिथी मा. मनोज भारशंकर (अबुधाबी, युएई), विशेष उपस्थिती मा. अशोक मानकर (माजी विधान परिषद सदस्य), प्रमुख अतिथी मा. प्रमोद काळबांडे (संपादक, दै. सकाळ, नागपूर) अतिथी मा. प्रा. अरुण पवार अध्यक्ष, म. फुले शिक्षण संस्था, नागपूर), मा. अविनाश ठाकरे (अध्यक्ष, केजेफोसिया, नागपूर) हे उपस्थित राहतील. डॉ. संगीता मानेकर-बानाईत सूत्रसंचालन करतील तर आभार मा. सचिन सुकलकर मानतील.

'पहिल्या अक्षरक्रांती आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सवा'ला साहित्यिक, संशोधक, रसिकांनी उपस्थित राहून भरपूर प्रतिसाद द्यावा; असे आवाहन आयोजन समितीचे अध्यक्ष मा. शंकर घोरसे, उपाध्यक्ष मा. प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त', सचिव डॉ. संगीता मानेकर-बानाईत, सहसचिव मा. गणेश भाकरे, कोषाध्यक्ष मा. भागवत बानाईत, सदस्य मा. सचिन सुकलकर, मा. लीलाधर दवंडे, मा. विजय वासाडे, मा. हितेश गोमासे, मा. वंदना घोरसे तसेच अक्षरक्रांती फाऊंडेशन व कला गौरव संस्थेच्या समस्त सदस्यांनी केले आहे.

# डोंगरकठोरा येथील अ.ध. चौधरी विद्यालयामध्ये रंगला माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



**यावल :** तालुक्यातील डोंगर कठोरा येथे 36 वर्षानंतर एकत्र आलेल्या दहावीतील माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनाच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी अनेकांना गहिवरून आले. यानंतर शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यामुळे ते देखील भारावले. माजी विद्यार्थ्यांनी शाळेला साउंड सिस्टिम व पंखे भेट दिले.

रविवारी अ.ध.चौधरी विद्यालयात सन 1986-87 च्या बॅचचा हा स्नेहमेळावा झाला. एकूण 60 माजी विद्यार्थी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्रकुमार झांबरे, तर प्रमुख पाहुणे त्याच बॅचचे विद्यार्थी तथा सरपंच नवाज तडवी, माजी शिक्षक व्ही.ए.पाटील, जी.डी.सरोदे, शरद राणे, विद्यमान मुख्याध्यापक नितीन झांबरे उपस्थित होते. प्रास्ताविकात हेमलता पाटील यांनी मेळावा आयोजनामागील भूमिका मांडली. यानंतर सर्व विद्यालयास 12 पंखे व साऊंड सिस्टिम भेट दिली. वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी शिकत असतानाच्या गमतीजमती सांगितल्या. शिक्षकांमुळे आपण घडल्याचे सांगितले. यावेळी अनेकांना गहिवरून आले. या बॅचला शिकवणाऱ्या माजी शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सुधीर चौधरी तर आभार संजय पाटील यांनी मानले.

यांची होती उपस्थिती टाटा मोटर्सचे सिनियर ऑपरेटर मधुकर पाटील, खोपोली येथील पोलिस निरीक्षक अशरफ तडवी, श्री समर्थ रघुनाथबाबा विद्यालयाचे शिक्षक सुधीर चौधरी, कोठारी मेटसॉलचे मॅनेजर सजंय पाटील, समर्थ ग्रीनटच प्रीतमपूरचे प्रोडक्शन मॅनेजर राजेंद्र झांबरे, संभाजीनगर येथील उद्योजक पुष्पराज झांबरे, सुनील होले, संस्थाचालक कल्याण विनय सरोदे, वन विभागाचे भटू अहिरे, मुक्ताईनगर येथील जि.प. शाळेचे मुख्याध्यापक युवराज नेहते, प्रगतीशील शेतकरी धर्मेंद्र पाटील, परेश भिरुड, किरण सरोदे, प्रवीण जावळे, सुपडू तडवी, प्रदीप पाटील, पल्लवी भारंबे उपस्थित होते.